**<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१३२/२०२४ मधील निशाणी क्र.१४ वरील आदेश</u>**

( CNR : MHAH250013042024 )

सामनेवाला क्र.१ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचेविरुध्द नि.१० च्या अर्जास म्हणणे नाही असा झालेला आदेश रद्द होण्याकरीता दाखल केला आहे. सामनेवाला क्र.१ ने प्रस्तुत अर्जाचे पुष्ट्यर्थ निशाणी क्र.१५ वर स्वतःचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

२. प्रस्तुत अर्जामध्ये सामनेवाला क्र.१ ने असे कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ ने नि.१० वर मुलगा विक्रमप्रतापसिंह याचा ताबा सामनेवाला क्र.१ कडुन मिळणेसाठी दाखल केला आहे. सदर अर्जास म्हणणे देणेकामी आवश्यक माहीती व कागदपत्रे वेळेत न उपलब्ध झाल्याने त्याला म्हणणे देता आले नाही. त्यामुळे दि.३०.१.२०२५ रोजी नो से चा आदेश पारीत झाला आहे. अर्जदार हिने सदर अर्जाची प्रत देखील सामनेवालास पुरवली नव्हती. सामनेवालाला म्हणणे देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. तसे न झाल्यास सदर सामनेवाला यास नैसर्गिक न्यायापासून वंचित रहावे लागणार आहे. सबब, सामनेवालाने त्यांचेविरुध्द झालेला म्हणणे नाही असा आदेश रद्द होऊन प्रस्तुत अर्जासोबत दिलेले म्हणणे दाखल करण्यास परवानगी मागितली आहे.

३. अर्जदाराने प्रस्तुत अर्जास म्हणणे देऊन असे कथन केले आहे की, मुळ अर्ज घरगुती हिंसाचार कायद्याखाली दाखल असुन प्रस्तुत अर्ज छोटया बाळाचा ताबा घेण्यासंदर्भात ३.८.२०२४ रोजी दाखल केला आहे. सामनेवालाने हेतुतः विलंब करुन मुळ अर्जास कैफीयत नउ देता प्रस्तुत अर्जास नो से चा आदेश झालेला सेट असाईड करणेसंदर्भात अर्ज दिला आहे. अर्जातील कारण खरे नाही व न्यायालयाची दिशाभूल करणारे आहे. सबब, अर्ज नामंजुर करण्यात यावा. अन्यथा जास्तीत जास्त खर्चाचा आदेश व्हावा.

४. अर्जदार व सामनेवाले यांचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

५. मुळ अर्जदाराने प्रस्तुत प्रकरण महिलांचा घरगुती हिंसाचारापासून संरक्षण कायदा, २००५ अन्वये दाखल केलेले आहे. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसून येते की, सामनेवाला यांच्याविरुध्द दि.३०.१.२०२५ रोजी नि.१३ वर म्हणणे नाही असा आदेश झालेला आहे व प्रस्तुतचा अर्ज सामनेवालाने दि.१०.२.२०२५ रोजी दाखल केलेला आहे.

सामनेवालांनी मुदतीत म्हणणे न दिल्याचे कारण संयुक्तीक वाटते. सामनेवालाने प्रस्तुत अर्जासोबत म्हणणे दाखल केलेले आहे. सामनेवालांचे म्हणणे दाखल करुन न घेतल्यास त्यांचे अतोनात नुकसान होईल तसेच त्यामुळे अर्जदाराचे कोणतेही नुकसान होणार नाही, उलट दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्यास मदत होणार आहे. सबब, अर्जातील कथनांचा विचार करता नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्जदार यांना रु.३००/- कॉस्ट देण्याच्या अटीवर अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र.१ यांचेविरोधात दि.३०.१.२०२५ रोजी झालेला म्हणणे नाही असा आदेश याव्दारे रद्द करण्यात येत आहे.

SHITAL CHANDRAKIRAN SALVI
Digitally signed by SHITAL CHANDRAKIRAN SALVI
Date: 2025.02.11 11:11:02 +0530

( एस. सी. साळवी )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
(न्यायालय क्र.२), पारनेर

**दि. १०.०२.२०२५**
**पारनेर**